॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव २५ (              ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेच्या वतीने दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०१९ दरम्यान शाश्वत भविष्यासाठी पर्यावरण व भुशास्त्रांतील नाविन्यपूर्ण घडामोडी या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे उद्घाटन २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता प्रशाळेच्या सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रमुख पाहुणे राष्ट्रीय औद्योगिक अभियांत्रिकी संस्था, मुंबई येथील प्रा. शंकर मुर्थी हे तर विशेष अतिथी राज्य पर्यावरण समितीचे सदस्य श्री. नंदुशेखर हे राहणार आहेत.

या परिषदेत देशभरातील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, गैरसंस्थांचे प्रतिनिधी भाग घेणार असून शाश्वत विकास साधण्यासाठी काय करता येईल याविषयी संशोधन विषयांचे तोंडी तसेच भित्तीपत्रकाद्वारे सादरीकरण होणार आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयातील शिक्षक, संशोधक विद्यार्थी यांनी परिषदेत सहभाग नोंदवावा असे आवाहन पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे, संयोजक प्रा.एस.एन.पाटील, आयोजन सचिव डॉ.एस.बी.अत्तरदे यांनी केले आहे.

------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१९ दि. २५ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in